# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सहाय्यक आयुक्त ए विभाग

## स्थळदरपत्रिका

दिनांक – १९.१०.२०२६

मान. महानगरपालिका आयुक्त यांनी मुंबई शहरातील सर्व रस्ते व पदपथ हे तेथून चालणा-रा पादचा-यांकरीता रहदारी व अतिक्रमण मुक्त ठेवण्याच्या अनुषंगाने "Pedestrian First" धोरणांतर्गत परि. क्र. एमजीसी/ए/४०६८ दि.०६.०८.२०२६ निर्गमित केले असून पादचा-यांच्या चालण्या योग्यतेत सुधारणा करण्यासाठी बहुतांश रस्त्यांलगतचे पदपथ तात्काळ अतिक्रमण मुक्त व समतल/ सुधारणा करण्याचे तसेच सुस्थितीत राखण्याचे निर्देश दिले आहेत.

महानगरपालिकेच्या 'ए' विभाग हद्दीअंतर्गत येणारे पदपथ हे पादचा-यांकरीता सुस्थितीत राखण्यात यावेत, जेणेकरुन महानगरपालिकेची प्रतिमा जनसामान्यांमध्ये उजळुन निघेल, याअनुषंगाने प्रभाग क्र. २२५ मधील काही महत्वाचे रस्ते, मनपा मुख्यालय, पोलिस मुख्यालय, जीएसटी भवन इ. तसेच छ.शि.म.ट. व चर्चगेट रेल्वे स्थानक यासारख्या महत्वाच्या आस्थापना तसेच विविध शाळा, महाविद्यालये, इस्पितळे इ. यांच्या सभोवतालच्या परिसरातील पदपथांचे सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षणात काही रस्त्यांलगतचे पदपथ हे दबलेल्या व असमतल अवस्थेत, तसेच काही ठिकाणचे पदपथावरील पेव्हर ब्लॉक्स तुटलेल्या व निघालेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले.

मान. महानगरपालिका आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदर पदपथ पादचा-यांच्या चालण्या योग्यतेत सुधारणा करण्यासाठी "Pedestrian First" धोरणांतर्गत तात्काळ समतल करणे आवश्यक आहे. सबब, खालील नमूद कामे ही अतितात्काळ व युध्दपातळीवर करावयाची असल्याने, तत्सम कामांचा अनुभव असलेल्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून या कार्यालयामार्फत खालील नमूद कामांकरीता स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहे.

| अनु क्र. | कामाचा तपशील | एकुण अंदाजित खर्च (जीएसटी सह) |
|---|---|---|
| १. | "Pedestrian First" धोरणांतर्गत पदपथ अतिक्रमण मुक्त व पादचा-यांच्या चालण्या योग्यतेत सुधारणा करण्यासाठी प्रभाग क्र. २२५ मधील विविध रस्त्यांलगतचे पदपथ समतल करणे.<br>Levelling the footpaths along various roads in Ward No. 225 under the “Pedestrian First” policy, to ensure encroachment free pedestrian movement. | रु.२,८७,०००.०० |
| २. | "Pedestrian First" धोरणांतर्गत पादचा-यांच्या चालण्या योग्यतेत सुधारणा करण्यासाठी प्रभाग क्र. २२५ मधील हजारीमल सोमानी मार्ग लगतचे पदपथ (दोन्ही बाजू) समतल करणे<br>Levelling the footpaths (Both side) along Hazarimal Somani Marg in Ward No. 225 under the “Pedestrian First” policy, to ensure encroachment free pedestrian movement. | रु.२,८८,५००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | "Pedestrian First" धोरणांतर्गत पादचा-यांच्या चालण्या योग्यतेत सुधारणा करण्यासाठी प्रभाग क्र. २२५ मधील महापालिका मार्ग येथील मनपा मुख्यालयासमोरील खाऊ गल्ली मधील पाथ-वे समतल करणे<br>Levelling the khau gully pathway along Mahapalika Marg in front of MHO in Ward No. 225 under the "Pedestrian First" policy, to ensure encroachment free pedestrian movement. | रु.२,७५,५००.०० |

पात्रता व निकष :

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.

२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी दरपत्रिका भरण्याची अंतिम तारीख २१.१०.२०२६ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत व दिनांक २१.१०.२०२६ रोजी सायं. ०४:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येतील.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग**